N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): जालना P.S.(ठाणे): घनसावंगी Year (वर्ष): 2021

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0041 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 10/02/2021 22:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): बुधवार

Time Period (कालावधी): पहर 5

Date From (दिनांक पासून): 10/02/2021

Date To ( दिनांक पर्यंत): 10/02/2021

Time From (वेळेपासून): 13:45 बजे

Time To (वेळेपर्यंत): 13:45 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 10/02/2021 Time (वेळ): 22:03 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद क्र.): 013 Date & Time (दिनांक आणि वेळ): 10/02/2021 22:03 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 1 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): एम आर जी एस कक्ष पंचायत समीती , पंचायत समीती घनसांवगी येथे, घनसांवगी

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): नारायण उत्तमराव मते वय 43 वर

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1978 (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.): Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देव हिवरा, ताधनसावंगी,घनसावंगी,धनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | देव हिवरा, ताधनसावंगी,घनसावंगी,धनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-8275932546**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश अशोकराव बारगजे | | | 1. पंचायत समिती, घनसावंगी,पंचायत समिती, घनसावंगी,घनसावंगी, धनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000 | 5,000. |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद घनसावंगी,जालना दिनांक
10.02.2021.मी नारायण उत्तमराव मते, वय 43 वर्ष, व्यवसाय शेती, रा.देव हिवरा, ता.घनसावंगी, जि.जालना. मोबाईल नंबर
8275932546, 7350214027. मी समक्ष हजर राहुन फिर्याद देतो कि, मी दिनांक 09/02/2021 रोजी सकाळी 10.00
वाजेच्या सुमारास माझे गाव देवहिवरा येथुन लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. संग्राम ताटे यांना मोबाईल् फोनद्वारे संपर्क
साधुन त्याना फोनद्वारे सांगीतले की, मी माझे शेतामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळे मिळण्यासाठी ग्रामपंचायत मार्फत
पंचायत समिती घनसावंगी येथे अर्ज केला आहे. परंतु तेथील एम.आर.जी.एस. कक्षात काम करणारे कर्मचारी मला त्यासाठी पैसे मागत आहे
असा फोन केल्यावर मी त्यांना घनसावंगी येथे येण्यास सांगीतले. त्यानंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी संग्राम ताटे व कर्मचारी
घनसावंगी येथे तिर्थपुरी रोडवर सुरक्षित ठिकाणी आले असतांना त्यांनी मला स्वत:ची व त्यांच्या सोबत असणारे दोन व्यक्ती हे पंच म्हणून
असल्याची ओळख करुन दिली. त्यांच्या समक्ष मी माझी तक्रार सांगीतली की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. मला
माझे गाव मौजे देवहिवरा शिवारात गट क. 101 मध्ये एक हेक्टर 59 आर शेतजमीन आहे. सदर गट क्र. 101 मध्ये मला शेततळे करणे
असल्याने व शासनाकडून शेततळे मिळण्यासाठी अनुदान मिळत असल्याने मी त्याबाबतचा अर्ज ग्रामपंचायत कार्यालय देवहिवरा येथे सादर
केला. त्यानूसार ग्रामपंचायतचा ठरावामध्ये मला शेततळे मिळण्याबाबतचा ठराव पास झाल्याने मी ग्रामपंचायतचा ठराव, सातबारा, नमुना क्र. 08
अ, आधारकार्ड, बँकखात्यांची पासबूकची झेरक्स अशा कागदपत्रांची पुर्तता करुन सदरची फाईल तसेच माझ्यासोबत गावातील इतर सहा
शेततळ्यांच्या लाभार्थ्यांची फाईल ग्रामपंचायत देवहिवरा यांच्या मार्फतीने नोंव्हेबर महिन्यात पंचायत समिती घनसावंगी येथे सादर केली.
त्यानंतर मी दिनांक 02/02/2021 रोजी पं.समीती घनसावंगी येथे माझ्या तसेच इतर सहा शेततळयाच्या लाभार्थ्यांच्या फाईली मंजुरीचे काम
झाले का याबाबत पंचायत समिती घनसावंगी येथील तांत्रीक सहाय्यक श्री बारगजे यांना विचारपूस केली असता त्यांनी स्पष्टपणे काहीच सांगीतले
नाही. त्यानंतर मी दिनांक 08/02/2021 रोजी माझ्या तसेच इतर सहा शेततळयाच्या लाभार्थ्यांच्या अनुदाना मंजुरीच्या चौकशीसाठी पंचायत
समिती घनसावंगी येथे जावून एम.आर.जी.एस. कक्षात काम करणारे तांत्रीक सहायक श्री. बारगजे साहेब यांना भेटलो असता व त्यांना
शेततळ्यांच्या फाईल बाबत विचारपूस केली असता त्यांनी सांगीतले की, तुमच्या तसेच तुमच्या गावातील इतर सहा लाभार्थी यांचे शेततळ्यांच्या
अनुदानाची फाईलचे प्रशासकिय मान्यतेसाठी पत्र तयार झाले आहे. त्या फाईलींवर गट विकास अधिकारी श्री. मनोहर जाधव यांची सही होणे
बाकी आहे. ती सही झाल्यावर आम्ही तुम्हांस शेततळ्यासाठी हजेरी पुस्तक व मोजमाप पुस्तिका देवू त्याकरिता एका फाईलचे हजेरी

पुस्तकेसाठी पाचशे रुपये व मोजमाप पुस्तिकेसाठी दोन हजार रुपये द्यावे लागतील. तरच मी तुमचा कार्यरंभ आदेश मंजुर करुन घेवू व तुम्हांस हजेरी मस्टर व मोजमाप पुस्तिका देवू असे म्हणून त्यांनी माझ्याकडे एकूण सात शेततळ्यांचे 17,500/- रुपये द्यावे लागतील. अशी पैशांची मागणी केली आहे. माझ्याकडे पैसे नसल्याने सदरची रक्कम नंतर आणून देतो असे सांगीतले. मी आज दिनांक 09/02/2021 रोजी श्री. बारगजे साहेब तांत्रीक सहायक पंचायत समिती घनसावंगी यांना पंचायत समिती घनसावंगी येथे भेटण्यासाठी जाणार असुन त्यावेळी मी त्यांना माझी व माझ्यागावातील इतर सहा लाभार्थ्यांच्या शेततळ्यांचा कार्यारंभ आदेश व तो झाल्यावर हजेरी व मोजमाफ पुस्तिका मिळण्यासाठी विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन ती स्वत: किंवा इतरामार्फत स्वीकारल्यास त्यांना पकडुन कार्यवाही करावी. माझी त्यांना लाच देण्याची इच्छा नाही परंतु त्यांना लाच दिली नाहीतर ते शेततळांचा कार्यारंभ आदेश व तो झाल्यावर हजेरी व मोजमाफ पुस्तिका देणार नाहीत. श्री. बारगजे साहेब यांची व माझी वैयक्तीक दुश्मनी नाही अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. श्री. बारगजे साहेब हे माझ्याकडे मागत असलेले पैसे हे लाचेचे असल्याचे मला माहिती आहे. अशी तक्रार दिली.त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.ताटे यांनी दिनांक 09/02/2021 रोजी माझी तक्रार पंचासमक्ष लेखी व टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन दिली.मी दिलेल्या तक्रारीवर मी पंचानी व पोलीस निरीक्षक श्री ताटे यांनी सहया केल्या आहेत. माझ्या तक्रारी वरुन मी बारगजे साहेब यांचे विरुध्द केलेली तक्रार खरी आहे काय व श्री.बारगजे साहेब हे माझ्याकडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी,लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला व पंच श्री. मुत्याल यांना पंचायत समिती, घनसावंगी येथे श्री बारगजे साहेब यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. त्याअगोदर तिर्थपुरी घनसावंगी रोडवर सुरक्षीत ठिकाणावरुन माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते. त्यावेळीचे भेटी मध्ये माझे व गावातील इतर सहा लाभार्थी यांचे महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर शेत तळ्याचा कार्यारंभ आदेश झाल्यावर प्रत्येक शेततळयासाठी हजेरी व मोजमाप पुस्तिका देण्यासाठी श्री.बारगाजे साहेब यांनी एका तळयाच्या हजेरी पुस्तकासाठी 500 रु व मोजमाप पुस्तक देण्याकरिता प्रत्येकी 2000 रु अशी लाचेची मागणी केली. व ती दिनांक 10/02/2021 रोजी लाच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यावरुन आज दिनांक 10.02.2021 रोजी ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी घनसावंगी येथील पंचायत समिती येथे श्री बारगाजे साहेब यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. तिर्थपुरी ते घनसावंगी रोडवर सुरक्षीत ठिकाणी शासकीय वाहनामध्ये अंथ्रासीन पावडरची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. तांत्रीक सहायक श्री. बारगाजे साहेब यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असणा-या 5,000/- रुपयास अंथ्रासीन पावडर लावली. श्री.बारगाजे साहेब यांना देण्यासाठी थ्रसीन पावडर लावलेले पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवले. सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या याबाबतचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ताटे साहेब यांनी मला सुचना दिल्या की, श्री.बारगाजे यांनी लाच स्वीकारल्यानंतर तुम्ही तुमच्या डोक्यावरुन डावा हात फिरवावा अशा सुचना दिल्या. त्यावरुन मला व पंच श्री.गणेश मुत्याल यांना तांत्रीक सहायक श्री बारगजे यांना भेटण्यासाठी पंचायत समिती घनसावंगी येथे पाठविण्यात आले. मी व पंच श्री. गणेश मुत्याल असे ठरल्याप्रमाणे माझ्या गाडीवरुन घनसावंगी येथील पंचायत समितीचे समोर आलो. आमच्या मागेच त्याठिकाणी परिसरात पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं 2 श्री. उढाण असे आले व श्री. बारगजे यांचे विरुध्द सापळा लावण्यात आला. सर्व जण एकमेकांना दिसतील अशा प्रकारे थांबले. तेव्हा मी माझ्या गाडीवरुन उतरुन पायी-पायी पंचायत समिती, घनसावंगी कार्यालयात गेलो. माझ्या पाठीमागे पंच क्रमांक 1.श्री मुत्याल व सापळा पथकातील पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व स्टाप असे आले. व मी पंचायत समिती, घनसावंगी तेथील एमआरईजीएस ऑफीसमध्ये श्री. बारगाजे साहेब यांना भेटुन 13.45 वा. सुमारास तंडजोडी अंती 5000/- रुपये त्यांना दिले. व त्यानी माझ्याकडील लाचेचे पैसे घेवुन त्यांचे शर्टाचे डाव्या खिशामध्ये ठेवले. त्यावेळी पंच श्री.गणेश मुत्याल हे समक्ष हजर होते. त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे माझ्या डोक्यावरुन डावा हात फिरवीला तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. उढाण असे लगेच पाठीमागुन त्याठिकाणी येवुन तांत्रीक सहायक श्री.बारगाजे यांना ताबडतोब पकडले. पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी श्री.बारगजे यांना त्यांची स्वत:ची व सर्वाची ओळख करुन दिली. तांत्रीक सहायक श्री. बारगाजे यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव रमेश अशोकराव बारगजे, वय 31 वर्षे, व्यवसाय नोकरी (तांत्रीक सहायक), पंचायत समिती, घनसावंगी, रा. नरडगव्हाण, ता.शिरुर, जि.बिड असे सांगीतले.तेव्हा त्याची तेथेच पंचासमक्ष अंगझडती घेवुंन त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम 5,000 रुपये पंचासमक्ष जप्त केले व मला पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री. बुजाडे यांचेकडुन बंद केला व माझे हात तपासण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, स्टाफ, दोन्ही पंच, मी व श्री.बारगजे यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.
नारायण उत्तमराव मते.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): shivaji dhondiba bantewad(I (Inspector)) / pi **or (**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (वि

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

on point of **jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / **informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पोलीस ठाणे घनसावंगी

**Name** (नाव): shivaji dhondiba bantewad

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): pi